## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
## NATIONAL SERVICE SCHEME
## AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING, SANGAMNER

| University Level Workshop to all Program Officers in Nashik and Nagar Districts regarding Tobacco free Society | Date: 30/05/2019 |
|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1. | Name of Program | University Level Workshop to all Program Officers and Students in Nashik and Nagar Districts regarding Tobacco free Society |
| 2. | Objectives | 1. To spread awareness about tobacco free society and No spiting movement.<br>2. To take pledge for not having any kind of tobacco chewing, smocking or consuming tobacco products. |
| 3. | Date of Conduction: | 30/05/2019 |
| 4. | Time of Conduction: | 9am to 5pm |
| 5. | Dignities Present:<br>(with designation) | 1.Dr.Prabhakar Desai, Coordinator, NSS, Savitribai Phule Pune University, Pune<br>2.Shri. Anil Shinde, Chief Executive Officer, AVSSVS<br>3.Dr.M.A.Venkatesh, Principal |
| 6. | Name of Dept. Coordinator: | Prof.Rahul Dhamak, Prof.S.R.Jondhale, Prof.S.B.Kawade, Prof. M.A.Chaudhari, Prof.M.A.Wakchaure, Prof.Rahul Gaikwad, Prof.D.T.Rahane, |
| 7. | Departments Involved: | All |
| 8. | No. of Participants (Students): | 40 |
| 9. | No. of Participants (Staff): | 125 |
| 10. | No. of Participants (Public): | No |
| 11. | Any Government Agency involved? If yes details: | Savitribai Phule Pune University |
| 12. | Any Non-Governmental Organization (NGO) involved? If yes details: | Pledge for Life NGO |
| 13. | Activity Details: | Conducted successfully University Level Tobacco free Movement workshop to 125 Program officers from Nashik and Ahmednagar district.<br>NSS students also attended the program. |
| 14. | Outcomes: | 1. All Program Officers gets awareness about tobacco free society and No spiting movement.<br>2. Everybody understood the plan of imparting anti-tobacco movement in their institute. |
| 15. | Remarks (if any) | |

Department NSS Coordinator

Prof.R.S.Pawase
NSS Program Officer
Programme Officer
National Service Scheme
Amrutvahini College of Engineering
Sangamner Pin-422608

Dr.M.A.Venkatesh
Principal
PRINCIPAL
Amrutvahini College o
SANGAMNER - 422
Dist.-Ahmednagar (

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८८११०८०२०

संदर्भ : रासेयो/२०१९-२०/६७

दि. १७/०५/२०१९

अत्यंत महत्त्वाचे

सुधारित परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य व
रासेयो कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तंबाखूमुक्त राष्ट्रीय अभियानात रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांनी अनिवार्यतः उपस्थित राहणेबाबत**

मा. संचालक, क्षेत्रीय संचलनालय, पुणे (युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार), मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो, मंत्रालय कक्ष, मुंबई आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांकरिता दि. २७ व २८ मे २०१९ रोजी अनुक्रमे अमृतवाहीनी अभियांत्रिकी महाविद्यालय, घुलेवाडी, संगमनेर व संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे जिल्हानिहाय तंबाखूमुक्त राष्ट्रीय अभियान या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये एकूण १२० महाविद्यालयांमधून ३६० स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळांचे आयोजन युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सुचविल्यानुसार व मा. संचालक, क्षेत्रीय संचलनालय, पुणे आणि मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो, मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी निर्देशित केल्यानुसार 'संबंध' नवी दिल्ली या सामाजिक संस्थेमार्फत करण्यात येत आहे. 'संबंध' नवी दिल्ली ही सामाजिक संस्था 'तंबाखूमुक्त तरूण' या विषयावर प्रभावीपणे काम करीत आहे. तरी **सोबत जोडलेल्या रासेयो संलग्नित महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी यादीनुसार आपल्या महाविद्यालयातील १ रासेयो कार्यक्रम अधिकारी व २ स्वयंसेवकांना अनिवार्यपणे पुढील ठिकाणी** एकदिवसीय कार्यशाळेत सहभागी होण्याबाबत सूचीत करावे व कार्यशाळा कालावधीमध्ये त्यांची कर्तव्य रजा मंजूर करावी. ह्या एकदिवसीय कार्यशाळेत कार्यक्रम अधिकारी व रासेयो स्वयंसेवक यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. केंद्रशासन, महाराष्ट्र शासन व विद्यापीठ प्रशासनाने याबाबत पुढील कृतिकार्यक्रम तयार केला आहे. त्यामुळे या कार्यशाळेतील संबधित महाविद्यालयाची उपस्थिती अतिशय महत्त्वाची व अनिवार्य आहे. याबाबत आपण संबधितांना योग्य ते स्पष्ट निर्देश द्यावेत अन्यथा रासेयो एकक नियमानुसार संबधितांवर योग्य ती कारवाई तात्काळ केली जाईल, याबाबतही आपण सूचित करावे. कळावे, ही विनंती.

| क्र. | जिल्हा | दिनांक | कार्यशाळा स्थळ व वेळ | संपर्क |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे शहर व ग्रामीण (यादीनुसार) | दि. २७/०५/२०१९ | संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, सकाळी ९.३० वाजता. | ०२०२५६०११५३<br>०२०२५६९७३४१ |
| २ | अहमदनगर व नाशिक जिल्हा (यादीनुसार) | दि. २८/०५/२०१९ | अमृतवाहीनी अभियांत्रिकी महाविद्यालय, घुलेवाडी, संगमनेर सकाळी ९.३० वाजता. | डॉ. रमेश पावसे<br>८२०८३६०७०१ |

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

टिप : या जिल्हानिहाय एकदिवसीय कार्यशाळा आयोजनाकरिता 'संबध' या संस्थेमार्फत सहभागी प्राध्यापक व स्वयंसेवकांचा नियमानुसार प्रवासखर्च (एस.टी. बसभाडे) देण्यात येणार आहे.

सोबत : जिल्हानिहाय महाविद्यालय यादी



संगमनेर : अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात तंबाखूमुक्त राष्ट्रीय अभियानांतर्गत कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. रमेश पावसे, आशिमा सरीन, डॉ. प्रभाकर देसाई, अनिल शिंदे, डॉ. एम. ए. व्यंकटेश व सुनीता अगरवाल.

# ‘अमृतवाहिनी’त तंबाखूमुक्त अभियान कार्यशाळा उत्साहात

संगमनेर, ता. ३० : तंबाखूमुक्त समाज आणि व्यसनमुक्त तरुण ही काळाची गरज आहे. या अभियानाच्या यशस्वितेसाठी अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालय नेतृत्व करील. स्वतः तंबाखू व व्यसनमुक्त राहण्याची शपथ घेण्याचे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले.

पुणे विद्यापीठ, संबंध सामाजिक राष्ट्रीय सेवा योजना आणि अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय व संबंध संस्था, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

संचालक आशिमा सरीन, प्रकल्प व्यवस्थापक देविदास शिंदे व आसाम येथील कार्यक्रम अधिकारी सुनीता अगरवाल यांनी चित्रफितीद्वारे केलेल्या सादरीकरणातून, नगर व नाशिक जिल्ह्यातील १२५ कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवकांशी संवाद साधला. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, डॉ. आर. एम. वाकचौरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश पावसे, जिल्हा समन्वयक डॉ. प्रताप फलफले, डॉ. श्रीकांत फुलसुंदर, डॉ. शैलेंद्र बनसोडे, प्रा. रवींद्र अहिरे उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रा. व्ही. पी. वाघे, डॉ. एन. आर. तेलरांधे यांनी परिश्रम घेतले.

# अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयात तंबाखूमुक्त राष्ट्रीय अभियानांतर्गत कार्यशाळा उत्साहात यशस्वी

संगमनेर (प्रतिनिधी)

तंबाखूमुक्त समाज आणि व्यसनमुक्त तरुण ही काळाची गरज असून या राष्ट्रीय अभियानात अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालय नक्कीच नेतृत्व करेल तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रत्येक कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक यांनी तंबाखूजन्य पदार्थांचे दुष्परिणामांची शास्त्रशुद्ध माहिती घेऊन आणि व्यसनमुक्तीची जनजागृती करून संदेशवाहकाचे कार्य करावे. यासाठी प्रथमत: स्वत: तंबाखूमुक्त आणि व्यसनमुक्त राहण्याची शपथ घेऊन सुरुवात करावी, असे उद्गार राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले. सा. फु. पुणे विद्यापीठ, संबंध सामाजिक राष्ट्रीय सेवा योजना आणि अमृतवाहिनी इंजीनीअरिंग कॉलेज संगमनेर आणि 'संबंध' संस्था नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या उद्घाटन प्रसंगी अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, डॉ. एम. आर. वाकचौरे, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश पावसे, जिल्हा समन्वयक डॉ. प्रताप फलफले, डॉ. श्रीकांत फुलसुंदर, डॉ. शैलेंद्र बनसोडे, प्रा. रवींद्र आदि उपस्थित होते.



यावेळी डॉ. देसाई यांनी कार्यशाळेच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल अमृतवाहिनी संस्थेचे अभिनंदन केले.

डॉ. एम. ए. व्यंकटेश यांनी अमृतवाहिनी परिसर तंबाखूमुक्त असल्याचे सांगून संबंध संस्था आणि सा. फु. पुणे विद्यापीठाच्या उपक्रमाच्या आयोजनास धन्यवाद दिले. यावेळी संबंध सामाजिक संस्थेचे मुख्य संजय शेठ, संचालक आशिमा सरीन, प्रकल्प व्यवस्थापक देविदास शिंदे आणि आसाम येथील कार्यक्रम अधिकारी मुनिता अगरवाल यांनी दिवसभर अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील १२५ कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवकांशी कार्यशाळेत उत्स्फूर्त संवाद साधला. यावेळी उपस्थितांना व्हीडीओ आणि प्रेझेन्टेशन द्वारे सविस्तर माहिती देण्यात येऊन आसाम येथील उत्कृष्ट व्यसनमुक्ती कार्य करणाऱ्या मुनिता अगरवाल यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांना जेवण, नाष्टा व येण्याजाण्याच्या खर्चाची व्यवस्था संबंध सामाजिक संस्था, नवी दिल्ली व अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे करण्यात आली.

सदर कार्यशाळेच्या उत्कृष्ट आयोजनासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश पावसे, रजिस्ट्रार प्रा. व्ही. पी. वाघे आणि डॉ. एन.आर. सेलमंधे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रमेश पावसे यांनी केले आणि आभार डॉ. एम.आर. वाकचौरे यांनी मानले.